!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४६१ २२-२-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# निधी उपलब्ध असलेली कामे वेळेत पूर्ण करा

## शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांचे निर्देश

### सा. बां., राष्ट्रीय महामार्ग, एम एस आर डी सी, जि. प., मनपाची समन्वय बैठक

**संभाजीनगर ( ता.२२ ) :** लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा करुन मोठ्या मेहनतीने मिळवलेल्या निधी परत जाऊ देऊ नका. निधी उपलब्ध असलेली कामे वेळेत पूर्ण करा व जिल्ह्यातील रस्त्यांच्या प्रस्तावाचा सातत्याने पाठपुरावा करा असे निर्देश शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिले. वेरुळ येथील हॅलीपॅडचे काम ही जलदगतीले पूर्ण करण्याच्या सुचनाही दिल्या.

बांधकाम भवन येथे जिल्ह्यातील रस्ते व बांधकामाच्या कामांना गती मिळावी यासाठी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ व एमएसआरडीसीच्या प्रमुख अधिकाऱ्यांची समन्वयक बैठक पार पडली या बैठकीस खासदार चंद्रकांत खैरे यांची जिल्ह्यातील रस्त्यांचा व घाटी रुग्णालयाच्या कामांचा आढावा घेतला. केंब्रिज ते महावीर चौक या राष्ट्रीय महामार्गाचे मनपा हद्दीतील रस्त्यांचे भुमी अधिग्रहण राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने करावे सोबतच संभाजीनग-पैठण व अजिंठा-संभाजीनगरच्या रस्त्यासाठीच्या जमीनीचे अधिग्रहणही त्यांनीच करावे असे निर्देश राष्ट्रीय महामार्गाला खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिले. सुभेदारी विश्रामगृहाच्या कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा हायकोर्टाचा निकाल लागलेला आहे. त्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावणाऱ्या प्रक्रियेत गती देण्याच्या ही सुचना त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिल्या.

खासदार निधीतुन सांसद आदर्शग्राम योजनेतील आडगाव भोसले व वेरुळला प्रस्तावित केलेली कामे जलदगतीने पूर्ण करा व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्यासाठी प्रस्तावित रस्ते लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन प्रस्तावित करण्यासाठी त्यांनी सांगितले. राष्ट्रीय महामार्ग २११ व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अंतर्गत कामात येणाऱ्या अडचणीला सोडवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने एनएचआयच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्याचे ही त्यांनी सांगितले. कन्नड, गंगापुर व वैजापुर येथील ग्रामीण भागातील अत्यंत वाईट अवस्था असलेल्या रस्त्यांच्या कामांना दुरुस्ती व कामे नव्याने प्रस्तावित करण्याचेही निर्देश खासदार चंद्रकात खैरे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले.पैठण रेल्वेस्टेशन या राष्ट्रीय महामार्गाला वाल्मी ते बजाज हा पाईपलाईन रस्ता जोडण्याच्या सुचना ही खासदार खैरे यांनी दिल्या. शहराच्या परिसरात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून होणाऱ्या रस्त्यांचा डिपीआरचे काम पूर्ण झाल्यावर जिल्हाधिकाऱ्यांसमोर प्रेझेंटेशन केल्या जाणार असुन त्यावर आलेल्या हरकती समाविष्ट करण्यात येणार असल्याचे प्रकल्प संचालक यु जे चांबरगोरे यांनी बैठकिस सांगितले.

१० जिल्ह्यांना रुग्ण सेवा पुरवणाऱ्या घाटीकडे सामाजिक जाणीववेतून बघण्याची गरज असुन अत्यल्प दरात आरोग्य सेवा देणाऱ्या घाटीच्या समस्या तातडीने सोडवा अन्यथा शिवसेना स्टाईलने समज द्यावी लागेल असे खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकिस अधिकाऱ्यांना ठणकावले. घाटीतील इमारतीसाठी १.४९ लाख रुपये मंजुर निधी आलेला असतांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्लॅन तयार केला गेल्या नसल्याने खासदार चंद्रकांत खैरे यांनी नाराजी व्यक्त केली. पाणी पूनर्भरण योजनेसाठी ही निधी उपलब्ध असतांना काम का होत नाही असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यावर अधिक्षक अभियंता सुर्यवंशी यांनी या कामांकडे तातडीने लक्ष देण्याच्या सुचना कार्यकारी अभियत्यांना दिल्या व बांधकाम विभागाकडे आलेल्या तक्रारी सोडवण्यासाठी तातडीची उपाय योजना करा असे आदेश दिले. पाणी ड्रेनेज विद्युत विभागाच्या तक्रारींचा पाढाच अभ्यासगत समिती सदस्य नारायण कानकाटे यांनी बैठकित मांडल्या.

या बैठकिस सहसंपर्कप्रमुख अण्णासाहेब माने, जिल्हाप्रमुख नरेंद्र त्रिवेदी, तालुकाप्रमुख रमेश बोरनारे, नंदकुमार शिंदे, सोमनाथ परदेशी, संजय अवस्थी, अशोक पटवर्धन, बी. व्ही.जोशी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक यु. जे. चांबरगोरे, सा.बां. चे मुख्य अभियंता किडे, अधिक्षक अभियंता सुर्यवंशी, एमएसआरडीसीचे अधिक्षक अभियंता खैरे, कार्यकारी अभियंता वृषाली गाडेकर, जागतिक बँक प्रकल्पच्या कार्यकारी अभियंता अरुधंती शर्मा, उपअभियंता बी. एस. सरवदे, एम. टी. क्षिरसागर, पी. बी. पवार, एस. जी. वड्डे, अधिक्षक अभियंता राष्ट्रीय महामार्ग व्ही. जी.बोडखे, घाटीचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत मस्के, अधिक्षक डॉ. सुहास जेवळीकर, कार्यकारी अभियंता सिकंदर अली, अभ्यागत समिती सदस्य नारायण कानकाटे, श्रीरंग आमटे, शिवाजी बनकर, एमटीडीसीचे एस बी बिन्हाटे आदिंसह जिल्ह्यातील अभियंता अधिकारी उपस्थित होते.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन/ गणेश वाघ**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525